## निशाण क्र. ६८ वरील आदेश

वादी हिने प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरूस्तीस परवानगी मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार, सदरील दावा वादीने प्रतिवादीविरूध्द शाखावार वाटपासाठी दाखल केला आहे. त्याप्रमाणे प्रत्येक शाखेतील उपलब्ध पक्षकाराना तसेच सातबारा सदरी नावे नमूद असलेल्या लोकांना याकामी प्रतिवादी म्हणून सामील केले आहे. मात्र दावा दाखल करण्यापूर्वीच सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १४ विष्णू सोनू आलव, प्रतिवादी क्र. १७ सावित्री सोनू आलव हे मयत असल्याचे बेलिफ रिपोर्टवरून समजून आले. तरी सदर प्रतिवादी क्र. १४ व १७ यांना प्रतिवादी क्र. १०, ११, १२, १३, १५ व १६ हेच वारस असल्याने प्रतिवादी क्र. १४ व १७ यांची नावे दाव्यातून कमी करण्यात यावीत. तसेच प्रतिवादी क्र. २५ सुजीत शांताराम आलव हे ही दावा दाखल करण्यापूर्वी मयत असून त्यांचे वारस प्रतिवादी क्र. २४, २६ याकामी दाखल असल्याने, प्रतिवादी क्र. २५ यांचे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे. सबब सदर दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास नि. क्र. ७९ ला म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो त्यांना मान्य नाही. दाव्यातील नमूद मिळकतीतील हक्कसंबंध असलेले प्रतिवादी कोण मयत आहेत यांची खात्री करणे व त्याचे वारस दाव्यात सामील करणे हे दावा दाखल करणेपूर्वी करणेची जबाबदारी ही वादीची आहे. वादीनी दावा दाखल सदर प्रतिवादी हे हयात आहेत अगर यांची चौकशी करणेची तसदीही घेतलेली नाही. त्यामुळे आता दावा दाखल करणेपूर्वी मयत झालेले प्रतिवादीचे वारस दावा दाखल केलेनंतर सदर प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणता येणार नाहीत. शिवाय वादी यांनी त्यांचे अर्जात प्रतिवादी क्र. २, ११, १३ हे कोठे व

केव्हा मयत झालेबाबत तारीख दिलेली नाहीत तसेच अर्जासोबत सदर प्रतिवादी यांचे मृत्यूप्रमाणपत्र ही हजर केलेले नाहीत. तरी सदर अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येवून वादी यांना सदर प्रतिवादी यांचे मृत्यूप्रमाणपत्र न्यायालयात हजर करणेस आदेश देणेत यावेत. सबब सदर अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. वादी, प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. प्रस्तूतचा दावा हा वाटप व कब्जाकरीता आहे असे दिसून येते. अर्जात नमूद केलेली दुरूस्ती दाव्यामध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या दाव्यामध्ये मयत झालेल्या पक्षकाराबाबत अशा प्रकारची तजवीज करणे आवश्यक आहे. सबब सदरची दुरूस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित वाटते. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात मूळीच बदल होणार नाही. तसेच सदर दुरूस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने आजपासून १४ दिवसांचे आत नियोजित दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक: १६/१०/२०१९

( बी. आर. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.10.17 10:48:38 +0530